जा.क्र. अअम/व्याप/परीक्षा/३४६९/२००५

अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय,
दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४.
दिनांक: २०/१२/२००५.

प्रति,
अधीक्षक अभियंता / नियंत्रक अधिकारी /
परिमंडळीय अधिकारी

**विषय:-** अ.अ.म. नाशिक तर्फे वेळोवेळी घेण्यात येणा-या विविध व्यावसायि परीक्षा / अर्हताकारी परीक्षा / विभागीय व स्पर्धात्मक परीक्षांचे निकाल ----------------------------------- जाहीर झाल्यानंतर संबंधीत परीक्षामध्ये उत्तीर्ण होणा-या व त्या अनुषंगाने शासकीय सेवेत पदोन्नती / वेतनवाढ इत्यादि आर्थिक व सेवाविषयक लाभ मिळण्यास पात्र ठरणा-या परीक्षार्थींच्या गुणपत्रिकांचे व निकालाचे संस्करण करुनच सेवापुस्तकात नोंदी घेण्याबाबत ..

**संदर्भ:-** या महाविद्यालयाचा जा.क्र. अअम/व्याप परीक्षा/३२/०५ दि. ४/८/२००५.

वरील संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने पुढे असे कळविण्यात येते की, २००४ सालापासून महाविद्यालयातर्फे घेण्यात येणा-या व्यावसायीक परीक्षाचे निकाल महाविद्यालयाच्या www.wresc.org या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येत आहेत. २००४ सालच्या मागील निकालही यथावकाश या संकेतस्थळावर दर्शविण्यात येतील, त्यामुळे वरील संदर्भीय पत्रात दिलेल्या सूचनांमध्ये अंशतः बदल करुन असे कळविण्यात येते की,

“या पुढील परीक्षांच्या निकालपत्राची खातरजमा संदर्भीय संकेतस्थळावरील निकालाशी करुनच योग्य त्या नोंदी संबंधीत परीक्षार्थींच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात याव्यात, त्यासाठी महाविद्यालयाशी संपर्क साधण्याची आवश्यकता नाही.”

काही अपवादात्मक बाबींबाबत खुलासा / स्पष्टीकरण आवश्यक असल्यास महाविद्यालयाशी संपर्क साधण्यात यावा.

**मुख्य अभियंता व प्राचार्य**
अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय
नाशिक.